# स्त्रीपुरुष तुलना

## स्वाध्याय

### परिच्छेद १

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ७ वरील (ओळ १ ते ९) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[एकदा आईबापांनी कन्यादान......................**

**...................... ते अनुभवांवाचून सांगणे कठीण. असो.]**

**अ. आकलन**

**कृ.१. ओघतक्ता पूर्ण करा.**

आईवडील आपल्या मुलीचे यथाशक्ती लाड करतात

↓

१

↓

२

↓

मुलीला सासरी चांगली वागणूक मिळावी म्हणून सासूसासऱ्यांची खुशामत करतात

**उत्तर:** १. कौतुकाने मोठी करतात.

२. चांगले स्थळ मिळावे म्हणून झटतात.


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**




उत्तर: १. खाली फाटकी घोंगडी पण वरती लाल भरगच्च किनखापाचे अस्तर.

२. तिला सोन्याने मढवून, रत्नखचित मंदिरात ठेवणे; पण तिच्याशी ममतेने न वागणे.

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**




उत्तर: १. मुलीस चांगले सासर न मिळाल्यास.

२. तिच्या पाठीत पतीच्या हाताचे सपाटे बसतात.

**कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. एकदा आईबापांनी कन्यादान करून ______ .

अ. तुमचे हातात मुलीचा हात देतात.

ब. तुमचे हातावर पाणी सोडलें म्हणजे निश्चिंत होतात.

क. तुमचे हातावर पाणी सोडलें म्हणजे झालें.

ड. तुमचे हातावर पाणी सोडलें म्हणजे झालें नाही.

२. आता याविषयी सर्व कच्ची हकीकत लिहूं गेले तर ______ .

अ. एक महाभारतच होईल.

ब. एक रामायणच होईल.

क. एक वाङ्मयच होईल.

ड. एक कादंबरीच होईल.

उत्तर: १. एकदा आईबापांनी कन्यादान करून **तुमचे हातावर पाणी सोडलें म्हणजे झालें.**

२. आता याविषयी सर्व कच्ची हकीकत लिहूं गेले तर **एक रामायणच होईल.**

**कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. आईबाप कन्यादान करून आपली मुलगी तिच्या पतीकडे पाठवतात.

२. आईवडील आपल्या मुलीला लाडाकोडात वाढवतात, जपतात.

३. सासूसासऱ्यांचा अपमान करून मुलीचे आईवडील मुलीला चांगले वागवावे यासाठी प्रयत्न करतात.

४. स्त्रियांना सोन्याने मढवून त्यांच्याशी प्रेमाने न वागल्यास त्या फार आनंदी होतात.

**उत्तर:** १. सत्य    २. सत्य

३. असत्य    ४. असत्य

**कृ.६. प्रश्न तयार करा.**

१. 'कन्यादान' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

२. 'करवत' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** १. लग्नप्रसंगी कोणत्या विधीमुळे आईवडीलांना त्यांची मुलगी अंतरते?

२. मुलीला चांगले सासर न मिळाल्यास ती तिच्या आईबापांच्या जिवास कशाप्रमाणे वाटते?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. शक्ती : ताकद : : [ ] : प्रशंसा

२. [ ] : पक्की : : प्रत्यक्ष : अप्रत्यक्ष

**उत्तर:** १. खुशामत    २. कच्ची

**कृ.२. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. घोंगडी, अस्तर, कृती, चादर.

२. ममता, दु:ख, आनंद, सुस्थल.

**उत्तर:** १. कृती २. सुस्थल

**कृ.३. शब्दसमूहाबद्दल एक शब्द द्या.**

१. सोनेरी, रुपेरी जरीच्या वेलबुट्टीचे काम केलेले रेशमी कापड : [ ]

२. एखाद्याची मर्जी संपादन करण्यासाठी केलेली स्तुती : [ ]

**उत्तर:** १. किनखाप २. खुशामत

**कृ.४. कंसात दिलेले वाक्प्रचार खाली दिलेल्या वाक्यांत योग्य त्या ठिकाणी वापरून वाक्ये पुन्हा लिहा.**
**(सोन्याने मढवणे, खुशामत करणे, जिवास करवत असणे, पाणी सोडणे, मर्जी राखणे)**

१. निर्वाण प्राप्तीसाठी राजपुत्र सिद्धार्थने आपल्या राजसुखाचा त्याग केला.

२. प्रत्येक उद्योजक त्याच्या गिऱ्हाईकांना खूश ठेवण्याचा प्रयत्न करतच असतो.

३. आधुनिक शेतीचा अवलंब करून किशोरने आपल्या कुटुंबास संपन्न केले.

४. आईने सहलीला जायची परवानगी द्यावी, यासाठी राजू आईची तोंड भरून स्तुती करत होता.

५. मुले चुकीच्या मार्गाला जाऊ नयेत म्हणून आईवडिलांना प्रचंड काळजी वाटते.

उत्तर: १. निर्वाण प्राप्तीसाठी राजपुत्र सिद्धार्थने आपल्या राजसुखावर **पाणी सोडले.**


२. प्रत्येक उद्योजक त्याच्या गिऱ्हाईकांची **मर्जी राखण्याचा** प्रयत्न करतच असतो.

३. आधुनिक शेतीचा अवलंब करून किशोरने आपल्या कुटुंबास **सोन्याने मढवले.**

४. आईने सहलीला जायची परवानगी द्यावी यासाठी राजू आईची **खुशामत करत होता.**

५. मुले चुकीच्या मार्गाला जाऊ नयेत म्हणून आईवडिलांच्या **जिवास करवत असते.**

**कृ.५. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.**




उत्तर: वार

**कृ.६. खाली दिलेल्या शब्दांपासून दोन अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.**

१. रत्न : [ ] २. भर : [ ]

**उत्तर:** १. रत्नखचित, रत्नपारखी

२. भरगच्च, भरदिवसा

**कृ.७. पुढील अपूर्ण वाक्य विविध प्रकारे योग्य शब्दयोजनेने पूर्ण करा.**

गंगुबाईंना त्यांचा नवरा मारहाण करताना पाहून ______ .

**उत्तर:** १. गंगुबाईंना त्यांचा नवरा मारहाण करताना पाहून **शेजारच्या उमाने पोलिसांना बोलावले व गंगुबाईंची जाचातून सुटका केली.**

२. गंगुबाईंना त्यांचा नवरा मारहाण करताना पाहून **गंगुबाईंच्या मुलांच्या मनावर विपरीत परिणाम होत असे.**

**क. माझा अभ्यास - व्याकरण**

**कृ.१. खालील शब्दांचे नाम, सर्वनाम, विशेषण व क्रियापद यांमध्ये योग्य वर्गीकरण करा.**

चांगले, मिळावे, ते, सुस्थल, तिला, झटतात.

**उत्तर:**

| नाम | सर्वनाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| सुस्थल | तिला, ते | चांगले | झटतात, मिळावे |

**कृ.२. खालील शब्द व विभक्ती यांच्या जोड्या जुळवा.**

| | शब्द | | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | आईबापांनी | अ. | षष्ठी |
| २. | मुलीस | ब. | सप्तमी |
| ३. | किनखापाचे | क. | द्वितीया |
| ४. | मंदिरात | ड. | तृतीया |

**उत्तर:** (१ - ड), (२ - क), (३ - अ), (४ - ब)

**कृ.३. वाक्यातील अधोरेखित अव्ययांचा प्रकार लिहा.**

'एकदा आईबापांनी कन्यादान करून तुमचे हातावर पाणी सोडले म्हणजे झालें.'

**उत्तर:** एकदा – क्रियाविशेषण अव्यय

हातावर – शब्दयोगी अव्यय

म्हणजे – उभयान्वयी अव्यय

**कृ.४. खालील सामासिक शब्दाचा विग्रह करून समास ओळखा.**

सुस्थल

**उत्तर:**

| सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|
| सुस्थल | चांगले असे स्थळ | कर्मधारय समास |

**कृ.५. खालील वाक्यांचा काळ ओळखा.**

१. आता याविषयी सर्व कच्ची हकीकत लिहू गेलें तर एक रामायणच होईल.

**उत्तर:** भविष्यकाळ

२. तिला चांगले सुस्थल मिळावे म्हणून ते किती झटतात.

**उत्तर:** साधा वर्तमानकाळ

**कृ.६. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. तिला चांगले सुस्थल मिळावे म्हणून ते किती झटतात ! **(विधानार्थी करा.)**

**उत्तर:** तिला चांगले सुस्थल मिळावे म्हणून ते खूप झटतात.

२. याविषयी सर्व कच्ची हकीकत लिहूं गेलें तर एक रामायणच होईल. **(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** याविषयी सर्व कच्ची हकीकत लिहूं गेलें तर एक रामायणच नाही का होणार?

**कृ.७. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

१. कोतुक | कौतूक | कौतुक | कौतृक

२. शक्तीसामर्थ | शक्तिसामर्थ | शक्तिसार्मथ्य | शक्तिसामर्थ्य

**उत्तर:** १. कौतुक २. शक्तिसामर्थ्य

**कृ.८. खाली दिलेल्या विरामचिन्हांची नावे लिहा.**

१. '...' २. !

**उत्तर:** १. एकेरी अवतरण चिन्ह

२. उद्गारवाचक चिन्ह

**ड. माझे मत**

**क्र.१. विवाहानंतर पती व सासरच्या मंडळींनी नवविवाहित मुलीशी कसे वागावे, असे तुम्हाला वाटते?**

उत्तर: आपला समाज पूर्वी पुरुषप्रधान होता; पण आता आपण स्त्रीपुरुष समानतेच्या दिशेने वाटचाल करत आहोत. ज्याप्रमाणे मुलाला प्रेमाची वागणूक दिली जाते तशीच वागणूक लग्नानंतर मुलगी सासरी आल्यावर तिलाही द्यावी. तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करण्याचा तिला पूर्ण अधिकार आहे, याची जाणीव ठेवून तिला शिक्षण, नोकरी, उद्योग यांचा मार्ग चोखाळू द्यावा. ती स्त्री आहे किंवा घरची सून आहे म्हणून तिला दुय्यम वागणूक देऊ नये. पतीनेही तिच्याशी समानतेने, आदराने व प्रेमाने वागावे. ती कुणाचीही गुलाम नाही, तर एक स्वतंत्र व्यक्ती आहे याची जाणीव सदैव असू द्यावी. घरगुती कामे ही पती व पत्नी या दोघांचीही जबाबदारी असल्याने केवळ पत्नीला घरकामांस जुंपू नये. पतीनेही घरकामात सहभाग घ्यावा. अर्थार्जनातही तिने सक्रिय सहभाग घ्यावा.

## परिच्छेद २


पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ७ वरील (ओळ १० ते २२) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.

[स्त्रिया निरंतर या संसारांत ......................

...................... त्यांचें प्रालब्धच म्हटले पाहिजे.]

### अ. आकलन

कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.





उत्तर: १. कष्ट        २. हाल

३. तहानभूक        ४. जाच

५. हाणमार

कृ.२. ओघतक्ता पूर्ण करा.





उत्तर: १. ती सर्व व्यवस्था पाहते.

२. पतीच्या मर्जीप्रमाणे वागते.

३. सदासर्वदा पतीच्या अर्ध्या वचनात राहते.


कृ.३. आकृतिबंध पूर्ण करा.




उत्तर: १. स्वामिगौरव

२. क्षुल्लक प्रीतीसाठी


**कृ.४. आकृतिबंध पूर्ण करा.**




**उत्तर:** १. पुन्हा कष्टाचे ओझे उचलण्यासाठी.

२. नवे काम शिकून ते करण्यासाठी.

**कृ.५. चौकट पूर्ण करा.**




**उत्तर:** १. पतीच्या गोड शब्दाच्या

२. लहानपणापासूनचा जाच

**कृ.६. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.**

१. तिच्याकडे पाहून जरा तुमची खुषीत हासून दातखिळी उकलली म्हणजे ________

अ. तिला त्या हास्यापुढे त्रिभुवन ठेंगणे वाटते.

ब. तिला त्या आनंदापुढे त्रिभुवन ठेंगणे वाटते.

क. तिला त्या खुशीपुढे त्रिभुवन छोटे वाटते.

ड. तिला त्या दातखिळीबद्दल नवल वाटते.

२. तेव्हां असे तुमचे इतके क्षुल्लक प्रीतीचे आतुर असूनही ________

अ. त्यांस नानाप्रकारचे दूषणें दिलें.

ब. त्यांस नानाप्रकारचे निंद्य विशेषण दिलें.

क. त्यांस नानाप्रकारचे स्तुत्य विशेषण दिलें.

ड. त्यांस नानाप्रकारचे वंद्य विशेषण दिलें.

उत्तर: १. तिच्याकडे पाहून जरा तुमची खुषीत हासून दातखिळी उकलली म्हणजे **तिला त्या आनंदापुढे त्रिभुवन ठेंगणे वाटते.**

२. तेव्हां असे तुमचे इतके क्षुल्लक प्रीतीचे आतुर असूनही **त्यांस नानाप्रकारचे निंद्य विशेषण दिलें**.

**कृ.७. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. स्त्रिया नेहमीच आराम करण्यात तरबेज असतात.

२. नवऱ्याचे दोन कौतुकाचे शब्द कानावर पडावे यासाठी घरातली स्त्री भरपूर कष्ट करते.

३. घरासाठी प्रचंड राबूनही स्त्रियांची निंदा केली जाते.

४. पुरुष संसारात अनेक कष्ट, हाल, तहानभूक, जाच, हाणमार सोसतात.

उत्तर: १. असत्य　　२. सत्य

३. सत्य　　४. असत्य

कृ.८. **प्रश्न तयार करा.**

'त्रिभुवन' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** पतीने पत्नीचे कौतुक केल्यास त्या आनंदापुढे तिला काय ठेंगणे वाटते?

## ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती

**कृ.१. खालील शब्दांना परिच्छेदातील पर्यायी शब्द शोधा.**

| मेहनत | इच्छा | हुकूम | बुटके | उत्साह |
|---|---|---|---|---|
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| कौशल्य | माया | पृथ्वी | प्रेम | त्रास |
| ↓ | ↓ | ↓ | ↓ | ↓ |
| ६ | ७ | ८ | ९ | १० |

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | कष्ट | २. | मर्जी |
| ३. | आज्ञा | ४. | ठेंगणे |
| ५. | उल्हास | ६. | निगुती |
| ७. | ममता | ८. | भूतल |
| ९. | प्रीती | १०. | जाच |

**कृ.२. खालील शब्दांचे विरुद्धार्थी शब्द लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | गोड | × | |
| २. | कमावणे | × | |
| ३. | नवे | × | |
| ४. | आनंद | × | |
| ५. | नशिबवान | × | |
| ६. | निंद्य | × | |

**उत्तर:** १. कडू  २. गमावणे
३. जुने  ४. दु:ख
५. दुर्दैवी  ६. स्तुत्य

**कृ.३. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. कौतुक, उल्हास, गौरव, भूषण

२. भाग्य, विशेषण, नशीब, प्रारब्ध

**उत्तर:** १. उल्हास  २. विशेषण

**कृ.४. शब्दसमूहाला एक शब्द द्या.**

स्वामीने (पतीने) केलेले कौतुक / गौरव :

**उत्तर:** स्वामिगौरव

**कृ.५. खालील वाक्यांतील वाक्प्रचार ओळखून त्याचा अर्थ लिहा.**

१. गरीब धोंडूने मुलास उच्च शिक्षण घेता यावे म्हणून शरीराचे रती रती तुकडे करून पैसे कमविले.

उत्तर: **शरीराचे रती रती तुकडे करणे** : खूप कष्ट करणे.

२. वाढते प्रदूषण प्रत्येक व्यक्तीला वैद्याचे दार पाहावयास लावत आहे.

उत्तर: **वैद्याचे दार पाहावयास लावणे** : आजारी पडणे.

३. वरिष्ठांची मर्जी राखण्यासाठी काही कर्मचारी वाटेल ती कामं करतात.

उत्तर: **मर्जी राखणे** : खुश ठेवणे.

४. अत्र्यांच्या भाषणाने गंभीर श्रोत्यांचीही दातखिळी उकलली.

उत्तर: **दातखिळी उकलणे** : हसण्यासाठी तोंड उघडणे.

५. आजच्या काळातील स्त्री पुरुषाच्या अर्ध्या वचनात राहावी, ही अपेक्षा करणे चुकीचे आहे.

उत्तर: **अर्ध्या वचनात राहणे** : आज्ञा पाळणे.

६. दादावहिनींनी एका अंध मुलाला दत्तक घेतलेले पाहून माझे अंत:करण सद्‌गद झाले.

उत्तर: **अंत:करण सद्‌गद होणे** : मन भरून येणे.

७. सीमाचा वक्तृत्वस्पर्धेत प्रथम क्रमांक आल्याने तिला त्रिभुवन ठेंगणे झाले.

उत्तर: **त्रिभुवन ठेंगणे होणे** : अतिशय आनंद होणे.

८. शेतात उत्कृष्ट दर्जाचे पीक यावे यासाठी शेतकरी रक्ताचे पाणी करतो.

**उत्तर: रक्ताचे पाणी करणे** : प्रचंड कष्ट करणे.

**कृ.६. दोन शब्दांतील रिकाम्या जागी एक शब्द भरून दोन अर्थपूर्ण शब्द तयार करा.**

१. स्वामी [ ] गीत

२. शिवण [ ] काज

**उत्तर:** १. स्वामिगौरव, गौरवगीत

२. शिवणकाम, कामकाज

**क. माझा अभ्यास - व्याकरण**

**कृ.१. परिच्छेदाच्या आधारे विशेषणे व विशेष्ये यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | **विशेषणे** | | **विशेष्ये** |
|---|---|---|---|
| १. | क्षुल्लक | अ. | शिवणकाम |
| २. | गोड | ब. | पक्वान्न |
| ३. | नाजूक | क. | शब्द |
| ४. | सुरेख | ड. | प्रीती |

**उत्तर:** (१ - ड), (२ - क), (३ - ब), (४ - अ)

कृ.२. खालील शब्दांचे विभक्ती प्रत्यय व विभक्ती देऊन कोष्टक पूर्ण करा.

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | संसारात | | |
| २. | शरीराचे | | |
| ३. | निगुतीने | | |
| ४. | वेळेस | | |

उत्तर:

| | शब्द | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| १. | संसारात | त | सप्तमी |
| २. | शरीराचे | चे | षष्ठी |
| ३. | निगुतीने | ने | तृतीया |
| ४. | वेळेस | स | द्वितीया/चतुर्थी |

**कृ.३. खालील अव्यये आणि अव्ययप्रकार यांच्या योग्य जोड्या जुळवा.**

| | अव्यय | | अव्ययप्रकार |
|---|---|---|---|
| १. | होईतोपर्यंत | अ. | क्रियाविशेषण अव्यय |
| २. | निरंतर | ब. | शब्दयोगी अव्यय |
| ३. | व | क. | उभयान्वयी अव्यय |

**उत्तर:** (१ - ब), (२ - अ), (३ - क)

**कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. त्रिभुवन २. पक्वान्न

**उत्तर:**

| | सामासिक शब्द | विग्रह | समास |
|---|---|---|---|
| १. | त्रिभुवन | तीन भुवनांचा समूह | द्विगू समास |
| २. | पक्वान्न | पक्व (शिजलेले) असे अन्न | कर्मधारय समास |

**कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. हें तूं स्वत: केलेंसना? **(विधानार्थी करा.)**

**उत्तर:** हे तू स्वत: केले आहेस.

२. स्त्रिया संसारासाठी अतोनात कष्ट करतात.

**(उद्‌गारवाचक करा.)**

**उत्तर:** स्त्रिया संसारासाठी किती कष्ट करतात!

**कृ.६. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे वचन बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

मी फार नशिबवान आहे.

**उत्तर:** **आम्ही** फार नशिबवान **आहोत.**

**कृ.७. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

अगर एखाद्याने आपले मित्राजवळ स्नेहमंडळांत मी फार नशिबवान आहे की मला घरात काही पहावे लागत नाही असे ममतेचे व भूषणाचे शब्द काढले तर तिला अत्यानंद होतो

**उत्तर:** अगर एखाद्याने आपले मित्राजवळ, स्नेहमंडळांत "मी फार नशिबवान आहे, की मला घरात काही पहावे लागत नाही." असे ममतेचे व भूषणाचे शब्द काढले तर तिला अत्यानंद होतो.

**कृ.८. खालील शब्द लेखननियमांनुसार लिहा.**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अतक:रण | २. | क्षूलक |
| ३. | अज्ञाकींत | ४. | सनेहमडंळ |

**उत्तर:**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अंत:करण | २. | क्षुल्लक |
| ३. | आज्ञांकित | ४. | स्नेहमंडळ |

**ड. माझे मत**

**कृ.१. या परिच्छेदातून तुम्हाला समजलेली तत्कालीन स्त्रियांची परिस्थिती व आजच्या स्त्रियांची परिस्थिती यांची तुलना करा.**

**उत्तर:** ताराबाई शिंदे यांच्या काळात स्त्रियांची स्थिती गुलामाप्रमाणे होती. त्यांना शिक्षणाचा हक्क नव्हता. कमी वयात लग्न लावले जात असे. लग्नानंतर त्यांचा अतोनात छळ होई, मारहाण सोसावी लागे. थोडक्यांत, स्त्रीला अनेक बंधनांत जगावे लागे. कशाचेच स्वातंत्र्य नव्हते. मात्र आजची स्त्रियांची स्थिती फार सुधारलेली आहे. आज स्त्रिया उच्च शिक्षण घेतात, उच्चपदांवर कार्यरत आहेत. सर्वच क्षेत्रांत स्त्रिया पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रगती करत आहेत. देशाच्या उन्नतीमध्ये स्त्रियांचा मोठा हातभार लागत आहे. अर्थार्जनामुळे स्त्री आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी झाली आहे. आता चूल व मूल ह्या तिच्या मर्यादा राहिल्या नाहीत, तर विज्ञान, तंत्रज्ञान, कला, क्रीडा, मनोरंजन, साहित्य अशा सर्व क्षेत्रांत स्त्रिया आपल्या कर्तृत्वाने मानदंड निर्माण करत आहेत. परंतु अजुनही कित्येक ठिकाणी स्त्रियांच्या शोषणाच्या घटना घडताना आढळतात. कायद्याचा आधार स्त्रियांना मिळत असूनही त्याविषयीची जागरूकता समाजातील सर्व स्तरांत दिसून येत नाही; म्हणूनच आतापर्यंतच्या वाटचालीतील यशावर समाधानी न राहता स्त्रीस्वातंत्र्याचे व समानतेचे विचार व्यापकतेने सर्वत्र पोहोचवण्याची गरज अजुनही आहे.

## परिच्छेद ३

**पाठ्यपुस्तकातील पृष्ठ क्र. ७-८ वरील (ओळ २३ ते ३२) वाचा व खालील प्रश्नांची उत्तरे द्या.**

**[अहारे दैवा? कायरे तुझी ......................**

**...................... सोसणें भाग झालें रे झालें.]**

### अ. आकलन


**कृ.१. आकृतिबंध पूर्ण करा.**

| | | |
|---|---|---|
| | स्त्रियांना यासारखे राबावे लागते | |
| (१) ← | स्त्रियांना यासारखे मनात भीती बाळगून वागावे लागते | → (२) |

उत्तर: १. भाड्याच्या बैलासारखे

२. हरीण व सशांप्रमाणे


**कृ.२. आकृतिबंध पूर्ण करा.**





**उत्तर:** १. स्वजातीला मोकळे ठेवून स्त्रियांना पाशबद्ध केले.

२. पुरुषांना सुख, तर स्त्रियांना दु:ख देऊन पक्षपात केला.

**कृ.३. चौकट पूर्ण करा.**

१. 


२. 


**उत्तर:** १. नवऱ्याची २. देवाच्या

## कृ.४. योग्य पर्याय निवडून विधाने पूर्ण करा.

१. ______ नाहींना मग हे कायरे!

अ. तुमचेजवळ मुक्तद्वार, पक्षपात

ब. तुमचेजवळ प्रवेशद्वार, पक्षपात

क. तुमचेजवळ मुक्तद्वार, पक्षाघात

ड. तुमचेजवळ मुक्तहस्त, पक्षपात

२. यावरून तुला देखील ______ ?

अ. पुरुषांचा अभिमान आहे ना

ब. पुरुषांचा कैवार आहे ना

क. पुरुषांचा तिटकारा आहे ना

ड. पुरुष जातीचा अभिमान आहे ना

**उत्तर:** १. **तुमचेजवळ मुक्तद्वार, पक्षपात** नाहींना मग हे कायरे!

२. यावरून तुला देखील **पुरुष जातीचा अभिमान आहे ना?**

**कृ.५. विधाने सत्य की असत्य ते ओळखा.**

१. लेखिकेच्या मते, देवाने पुरुषांना सुख तर स्त्रियांना दु:ख देऊन पक्षपात केला.

२. स्त्रियांना भाड्याच्या बैलासारखे सतत राबावे लागते.

३. पुरुषांना सतत सशांप्रमाणे घाबरून राहावे लागते.

४. पुरुषांना सदासर्वदा स्त्रियांची मर्जी सांभाळावी लागते.

**उत्तर:** १. सत्य २. सत्य

३. असत्य ४. असत्य

**कृ.६. प्रश्न तयार करा.**

'स्वजात' हे उत्तर येईल असा प्रश्न तयार करा.

**उत्तर:** स्त्रियांना पाशबद्ध करून परमेश्वराने कोणाला सर्वापरी मोकळ्या ठेवल्या आहेत?

**ब. माझा अभ्यास - शब्दसंपत्ती**

**कृ.१. सहसंबंधानुसार रिकाम्या जागा भरा.**

१. नवरा : पती : : कब्जा : [ ]

२. नाजूक : मजबूत : : [ ] : निष्पक्षपात

३. भय : भीती : : दासी : [ ]

४. सुख : दुःख : : बद्ध : [ ]

**उत्तर:** १. ताबा २. पक्षपात

३. बटकी ४. मुक्त

**कृ.२. गटात न बसणारा शब्द ओळखा.**

१. दैव, विधाता, परमेश्वर, ललाट

२. पती, नवरा, देव, पुरुष

**उत्तर:** १. ललाट २. देव

**कृ.३. खालील वाक्प्रचारांचा अर्थ सांगणारा योग्य पर्याय निवडा.**

१. पाशबद्ध करणे :

अ. पाशातून सोडवणे.

ब. बंधनात अडकवणे.

क. पाश बनवणे.

ड. बुद्धी देणे.

**उत्तर:** बंधनात अडकवणे.

२. ललाटपटावर शिक्के मारणे :

अ. कापडावर शिक्के मारणे.


ब. ललाटावर कोरीव काम करणे.

क. भविष्य निश्चित करणे.

ड. मत निश्चित करणे.


**उत्तर:** भविष्य निश्चित करणे.

क्र.४. खालील शब्दातील अक्षरांपासून अर्थपूर्ण शब्दांची रचना करा.




**उत्तर:** ललाट, पट, लप, लाल, लाट, टप

क्र.५. खाली दिलेल्या शब्दातील अक्षरांपासून तयार न होणारा शब्द शोधा.




**उत्तर:** वाडा

## क. माझा अभ्यास - व्याकरण

क्र.१. खालील शब्द व त्यांच्या जाती यांच्या योग्य जोड्या जुळवा.

| | शब्द | | जाती |
|---|---|---|---|
| १. | कळली | अ. | नाम |
| २. | विचित्र | ब. | सर्वनाम |
| ३. | ते | क. | विशेषण |
| ४. | स्त्री | ड. | क्रियापद |

**उत्तर:** (१ - ड), (२ - क), (३ - ब), (४ - अ)

कृ.२. खालील शब्दांचे सामान्यरूप, विभक्ती प्रत्यय आणि विभक्ती ओळखून कोष्टक पूर्ण करा.

| शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| ताबेदारीत | | | |
| नवऱ्याची | | | |
| स्त्रियांना | | | |

उत्तर:

| शब्द | सामान्यरूप | विभक्ती प्रत्यय | विभक्ती |
|---|---|---|---|
| ताबेदारीत | ताबेदारी | त | सप्तमी |
| नवऱ्याची | नवऱ्या | ची | षष्ठी |
| स्त्रियांना | स्त्रियां | ना | द्वितीया/चतुर्थी |

कृ.३. खालील अव्ययांचा प्रकार ओळखून वाक्यात उपयोग करा.

१. प्रमाणे        २. आहा !

१. प्रमाणे : शब्दयोगी अव्यय

**वाक्य:** शहरातील माणसांचे जीवन घड्याळाच्या काट्या**प्रमाणे** सतत फिरत असते.

२. आहा ! : केवलप्रयोगी अव्यय

**वाक्य:** **आहा** ! काय सुंदर सूर्यास्ताचा देखावा आहे !

**कृ.४. खालील सामासिक शब्दांचा विग्रह करून समास ओळखा.**

१. सदोदित २. रात्रंदिवस

३. मुक्तद्वार

**उत्तर:**

| | **सामासिक शब्द** | **विग्रह** | **समास** |
|---|---|---|---|
| १. | सदोदित | दर दिवशी | अव्ययीभाव समास |
| २. | रात्रंदिवस | प्रत्येक रात्र व दिवस | अव्ययीभाव समास |
| ३. | मुक्तद्वार | मुक्त असे द्वार | कर्मधारय तत्पुरुष समास |

**कृ.५. कंसातील सूचनेप्रमाणे खालील वाक्यांचे रूपांतर करा.**

१. पक्षपाताचा बाप झाला ना हा ! **(प्रश्नार्थी करा.)**

**उत्तर:** पक्षपाताचा बाप नाही का झाला हा?

२ काय रे तुझी विचित्र गती? **(विधानार्थी करा.)**

**उत्तर:** तुझी गती विचित्र आहे.

**कृ.६. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाचे लिंग बदलून वाक्य पुन्हा लिहा.**

<u>बाबा</u> तू तर करून चुकलास.

**उत्तर:** **बाई** तू तर करून **चुकलीस**.

**कृ.७. लेखननियमांनुसार अचूक शब्द ओळखा.**

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १. | मुक्तद्वार | मूक्तदार | मूक्तद्वार | मुत्कद्वार |
| २. | पाषबद्ध | पाषबद्द | पाशबद्ध | पाशबद्द |

**उत्तर:** १. मुक्तद्वार २. पाशबद्ध

**कृ.८. योग्य ठिकाणी विरामचिन्हे घालून वाक्य पुन्हा लिहा.**

अरे तुम्ही देवना तुमचेजवळ मुक्तद्वार पक्षपात नाहींना मग हें कायरे पक्षपाताचा बाप झाला ना हा

**उत्तर:** अरे, तुम्ही देवना ! तुमचेजवळ मुक्तद्वार, पक्षपात नाहींना मग हें कायरे !, पक्षपाताचा बाप झाला ना हा !

**ड. माझे मत**

**कृ.१. स्त्री-सुधारणेला आपल्या कार्यातून चालना देणाऱ्या एका महिलेविषयी माहिती द्या.**

**उत्तर:** डॉ. आनंदीबाई जोशी या परदेशात जाऊन 'डॉक्टर' ही पदवी घेणाऱ्या पहिल्या भारतीय महिला होत्या. पती गोपाळराव जोशी यांचा त्यांच्या शिक्षणाला भक्कम पाठिंबा होता. त्यामुळे वयाच्या नवव्या वर्षी लग्न होऊनही आनंदीबाईंनी शिक्षण पूर्ण केले व पेन्सिल्व्हानिया येथील वैद्यकीय विद्यापीठात प्रवेश घेतला. समाजाने त्यांच्या विदेशात जाऊन शिक्षण घेण्याला विरोध केला; पण त्या आपल्या निर्णयावर ठाम राहून शिक्षण पूर्ण करूनच परतल्या. त्यांना भारतात वैद्यकीय महाविद्यालय सुरू करायचे होते; पण नियतीने त्यांना साथ दिली नाही. क्षयरोगाने त्यांना ग्रासले व त्यांची जीवनज्योत मालवली. अवघ्या २१ वर्षांच्या जीवनयात्रेत त्यांनी भारतीय स्त्रियांपुढे आदर्श उभा केला. स्त्रीशिक्षणासाठी समाजाचे मनपरिवर्तन करण्यासाठी जेथे अनेक समाजसुधारक झटत होते, त्याच काळात डॉ. आनंदीबाईंनी आपल्या कर्तृत्वाने एक मानदंडच घालून दिला.

## सारांश लेखन

**'स्त्रीपुरुष तुलना' हा पाठ लक्षपूर्वक वाचून पाठाच्या आशयाचा सारांश लिहा.**

या पाठात ताराबाई शिंदे यांनी एकोणिसाव्या शतकातील स्त्रियांच्या परिस्थितीचे वर्णन केले आहे. त्या काळी माहेरी आईवडिलांनी लाडाने वाढवलेली मुलगी सासरी आल्यावर तिचा छळ केला जाई. पतीकडून तिला मारहाण होई. स्त्रीच्या या वेदनेला ताराबाईंनी शब्दरूप दिले. संसारात कष्ट, जाच, हाणमार सोसून स्त्रीला अपेक्षा असते, ती पतीकडून प्रशंसेची. पतीचे दोन कौतुकाचे शब्द ऐकण्यासाठी ती आतुर असते; पण ते काही तिला लाभत नाही. प्रेम लाभत नाही आणि एवढे करूनही स्त्रियांना चिमटीभर दाण्याचीही सत्ता नाही. मत मांडण्याचे स्वातंत्र्य नाही. स्त्रियांना अशा प्रकारे पाशबद्ध केल्याबद्दल लेखिका विधात्याला जाब विचारते आहे, की तुझ्यासाठी सर्व समान असताना, तूच पुरुषांना मोकळे ठेवून स्त्रियांना बंदिस्त का ठेवलेस? तू हा पक्षपात केलास; पण त्यामुळे समस्त स्त्री जातीला सोसावे लागत आहे. या पाठातून तत्कालीन स्त्री किती बंधनांत अडकली होती याचे दर्शन घडते.